CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

रविवार, दि. ७ जानेवारी २०२४



## नागपुरातील आईस फॅक्टरीत स्फोट

**नागपूर** : कपिलनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उप्पलवाडी येथील बालाजी आइस फॅक्टरीत स्फोट झाल्याने एका श्रमिकाचा मृत्यू झाला असून तीन श्रमिक जखमी झाले आहेत. ही घटना शनिवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास घडली. दोन श्रमिकांना मेयोत दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती कपिलनगर पोलिसांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही फॅक्टरी विजय जुगलकिशोर शाहू यांच्या मालकीची असून, गेल्या जूनपासून उत्पादन बंद आहे. सुमारे पाच हजार चौरस फुटात असलेल्या फॅक्टरीच्या पहिल्या माळ्यावर श्रमिक राहतात.

## पाथरी येथील शेततळ्यात महिलेचा मृतदेह

**सोलापूर** : पाथरी (ता.उत्तर सोलापूर) येथील श्रीकांत बंडगर यांच्या शेतातील तळ्यात एका ३६ वर्षीय महिलेचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. शनिवारी दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. कानुबाई अंबादास बंडगर (वय ३६ रा. पाथरी) असे मयत महिलेचे नाव आहे. ती मजुरीसाठी म्हणून शुक्रवारी दुपारी घरातून गेली होती. त्यानंतर तिचा मृतदेह शनिवारी शेततळ्यात आढळून आला. घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून घटनेमागील कारण समजले नाही. फौजदार बनसोडे पुढील तपास करीत आहेत.

# हिंदू आक्रोश मोर्चात हुल्लडबाजी; काही दुकानांवर दगडफेक

- मधला मारुती ते कौतम चौक वातावरण तंग
- पोलिसांनी परिस्थिती आणली नियंत्रणात

सुराज्य/सोलापूर

**सकल हिंदू समाजाच्या वतीने शनिवारी दुपारी आपल्या विविध मागण्याकरिता काढण्यात आलेल्या जन आक्रोश मोर्चात किरकोळ दगडफेकीची घटना घडलीय. ही घटना आणि हुल्लडबाजीमुळं टिळक चौक ते कौतम चौक परिसरात काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं,काही समाजकंटक तरुणांनी दगडफेक केली तर काही ठिकाणी सोडाच्या बाटल्या फेकण्याची दिसून आले, परंतु पोलीस प्रशासनाच्या तगडा बंदोबस्त अन् समयसूचकता परिस्थिती निवळण्यास महत्त्वपूर्ण ठरलीय.**

शनिवारी सायंकाळच्या सुमारास तेलंगणाचे आमदार राजा सिंह ठाकूर यांच्यासह आमदार नितेश राणे, मोर्चा समन्वयक सुधीर भैरवाडेसह हिंदू जन आक्रोश मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून कन्ना चौकाकडे मार्गस्थ झाला. मोर्चात सहभागी झालेले युवक 'जय श्रीराम' च्या घोषणा देत होते, तसेच पाकिस्तानच्या विरोधातील घोषणा देत होते.

सायंकाळी साडेसहा-पावणे सातच्या सुमारास हा मोर्चा मार्गावरील टिळक चौक येथे आला. त्यावेळी तरुणांनी हुल्लडबाजी केली. याठिकाणी आल्यानंतर मोठमोठ्याने घोषणा दिल्या जात होत्या. मधला मारुती ते कौतम चौक दरम्यान रस्त्यावर दोन्ही बाजूला मोठ्या संख्येने एका समुदायाची दुकाने आहेत. त्यामुळे तरुणांना अधिकच जोश आला.

यातच काही जणांनी दुकानावर दगड फेकून तर काहींनी सोडाच्या बाटल्या फेकल्या गेल्याचे सांगण्यात आले, पण नेमके हे दगड आणि सोडाच्या बाटल्या कुठून आले हे मात्र समजू शकले नाही. पुढील अनर्थ घडू नये,म्हणून व्यापाऱ्यांनी आपली दुकाने पटापट बंद केली.मोर्चातला बराचसा भाग हा कन्ना चौकापर्यंत पोहोचलेला असताना शेवटच्या टोकाला असलेल्या काही युवकांनी हा गोंधळ केल्याचे प्रत्यक्ष दर्शीनी सांगितले.

फौजदार चावडी पोलीस व जोडभावी पोलीस ठाण्याचे पोलीस पथकाने या ठिकाणी धाव घेतल्याने हुल्लडबाजी कमी झाली.गोंधळ करणाऱ्या युवकांना पुढे हुसकावून लावण्यात आले. आणि मोर्चा पुढे मार्गस्थ झाला. काही वेळानी सारे काही शांत झाल्यानंतर सायंकाळी साडेसात नंतर व्यापाऱ्यांनी आपली दुकाने उघडण्यास सुरुवात केली.




**तगडा बंदोबस्त, वाहतुकीस रस्ता बंद :** शहर पोलीस वाहतूक शाखेने मधला मारुती ते कोंतम चौक दरम्यानचा रस्ता वहातुकीस बंद केला गेला होता.फौजदार चावडी पोलीस ठाणे तसेच जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक चौक ते कन्ना चौक दरम्यान मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.सध्या संबंधित ठिकाणी परिस्थिती शांततेत असून, कोणालाही ताब्यात न घेतल्याचं पोलिसांनी सांगितलंय.

अकलूजमधील वैद्यकीय क्षेत्रात खळबळ...

## चार डॉक्टरांवर अत्याचाराचा गुन्हा दाखल

**९ जानेवारीपर्यंत जामीन मंजूर**

सुराज्य/अकलूज



पैशांच्या देण्या घेण्यावरून अकलूजमधील वैद्यकीय क्षेत्रात नावाजलेल्या चार डॉक्टरांनी विवाहित महिलेवर अत्याचार केल्याच्या फिर्यादीवरून अकलूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर डॉक्टरांनी माळशिरस न्यायालयात दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावर आज सुनावणी होऊन त्यांना ९ जानेवारीपर्यंत जामीन मंजूर करण्यात आला आहे.

या घटनेने अकलूज वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. याबाबत अकलूज पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पिडीत महिला ही अकलूज येथील अकलाई हॉस्पिटल येथे काम करीत होती. तिने उच्च शिक्षणासाठी ३५ हजार रुपये हॉस्पिटलकडून घेतले होते. ते पैसे पगारातून वजा करावेत, अशी विनंती सदर पिडीत महिलेने हॉस्पिटलकडे केली होती. या हॉस्पिटलचे संचालक डॉ. भूषण भारत चंकेश्वरा, डॉ. सुनील सुभाष नरूटे, डॉ. शैलेश भानुदास गायकवाड, डॉ. सचिन सावंत (अकलूज) यांनी उसने दिलेले पैसे पगारातून न फेड करता तू आमच्याशी शारीरिक संबंध ठेव, अशी त्या महिलेकडे मागणी करून फेब्रुवारी २०२२ ते २८ जून २०२४ दरम्यान अकलाई हॉस्पिटलच्या डॉक्टर रुममध्ये सदर महिलेवर वारंवार अत्याचार केल्याची फिर्याद पिडीतेने अकलूज पोलीस ठाण्यात दि. ३ जानेवारी २०२४ रोजी दिली. याप्रकरणी सर्व डॉक्टरांनी गुन्हा दाखल होण्यापूर्वीच दि. ३० डिसेंबर २०२३ रोजी माळशिरस न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेतली असता त्याच दिवशी सुनावणी होऊन न्यायालयाने सर्व डॉक्टरांना अंतिम सुनावणी दि. ९ जानेवारी होइपर्यंत तात्पुरता जामीन मंजूर केल्याची माहिती अकलूज पोलिसांनी दिली.


## ओबीसींच्या हक्कासाठी आकाश पाताळ एक करु

### पंढरपूरच्या मेळाव्यात भुजबळांचा एल्गार

सुराज्य/पंढरपूर

ओबीसी चळवळीचे नेते तथा राज्याचे अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत शनिवारी पंढरपुरात ओबीसींचा एल्गार मेळावा झाला.यावेळी बोलताना भुजबळ हे कमालीचे आक्रमक दिसते. मला मंत्रिपदाची पर्वा नाही. मंत्रिमंडळातही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसमोर जे बोलायचे ते बोललोय मी.नाही म्हणजे नाही.मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देताच येणार नाही.ओबीसींच्या हक्कासाठी आकाश पाताळ एक करू, असा इशारा छगन भुजबळांनी दिला.

आरक्षण हे गरिबी आणि श्रीमंतीवर नाही, असे स्पष्ट करून ते पुढे म्हणाले कीं, त्यांची २०० पोरं गाड्या घेऊन मुंबईत गेलीत. कुठल्या मैदानावर उपोषण करायचे ते पाहण्यासाठी. सारखं आमची पोरं गरीब असं म्हटलं जातं. पण आरक्षण हे गरिबी आणि श्रीमंतीवर नाही. आरक्षण ज्या समाजाला काही मिळत नाही त्यांच्यासाठी नाही. त्यामुळे आरक्षण तुम्हाला तुम्ही श्रीमंत आहात याच्यावर नाही, तुम्ही सामाजिक दृष्ट्या किती मागसलेले आहात याच्यावर अवलंबून आहे. मंत्रालयातही ५४ टक्के मराठा समाजाची माणसं आहेत, असे म्हणत भुजबळांनी जरांगे यांच्यावर थेट वार केला.




#### पांडुरंग सगळ्यांचा आहे

पंढरीचा पांडुरंग सगळ्यांचा आहे. मी मागच्या वेळी देखील सगळ्या संतांची नावं वाचून दाखवली होती. या सगळ्या संतांचं म्हणणं एकच आहे. सगळे एकत्र येऊ. निवडणूक आली की सगळ्या पक्षांचे नेते पांडुरंगाचं दर्शन घ्यायला जातात. तेव्हा त्यांना अडवलं जात नाही. मग आरक्षणाच्या वेळेसच का अडवलं जातं, असा सवाल भुजबळांनी यावेळी उपस्थित केला.

#### ती मावळ्यांची सेना होती

शिवरायांच्या नावावरुन आम्हाला बोललं जातं. पण लक्षात ठेवा छत्रपतींची मराठा सेना नव्हती ती मावळसेना होती. छत्रपतींची समाधी ही महात्मा फुलेंनी शोधून काढली. पहिली शिवजयंती फुलेंनी सुरु केली. पहिला पोवाडा फुलेंनी सुरु केला. शिवाजी महाराजांचं नाव घेता आणि आमच्यावर हल्ले करता असा सवाल देखील भुजबळांनी यावेळी उपस्थित केला.

#### जरांगेंचा धसका


राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे वरिष्ठ नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ हे ओबीसी मेळाव्याच्यानिमित्ताने पंढरपूरला आले होते. मात्र, अजितदादा गटातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या मराठा समाजातील नेत्यांनी त्यांच्याकडे पाठ फिरवल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात आले. पक्षाचे वरिष्ठ नेते जिल्ह्यात आल्यानंतर त्यांच्या स्वागतासाठी आमदार आणि स्थानिक नेते जातात. मात्र, सोलापुरातील मराठा नेत्यांनी मनोज जरांगे-पाटील यांचा धसका घेतल्याचे मानले जात आहे. मेळाव्यासाठी ओबीसी नेते तथा मंत्री छगन भुजबळ हे शुक्रवारी संध्याकाळी पंढरपुरात दाखल झाले होते. मात्र, पंढरपूर तालुका आणि सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचा एकही मराठा नेता त्यांच्या स्वागताला पोहोचला नव्हता. जिल्ह्यात माढ्याचे आमदार बबनराव शिंदे, मोहोळचे आमदार यशवंत माने आणि करमाळ्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत अपक्ष आमदार संजय शिंदे हे अजितदादांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. मात्र यातील सर्वच आमदारांनी छगन भुजबळ यांच्यापासून चार हात दूर राहणे पसंत केल्याचे दिसून आले.

#### ओबीसीमधून आरक्षण मिळणार नाही

ओबीसी समाजातून मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही म्हणजे नाही. आरक्षण स्वतंत्र घ्या. ओबीसीमधून आरक्षण तुम्हाला मिळणार नाही, असं देखील भुजबळांनी म्हटलं. आमचा मराठा आरक्षणाला आणि मराठा समाजालाही विरोध नाही. पण आरक्षणाखाली जी झुंडशाही सुरु आहे, त्याला आमचा विरोध आहे,अशीही भूमिकी त्यांनी स्पष्ट केली.

## राज्यात कोरोनाच्या १५४ रुग्णांची नोंद

**मुंबई** : राज्यात आज कोरोनाच्या १५४ नव्या रुग्णांची भर पडली आहे. तर आजच्या दिवशी १%२ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. शनिवारी राज्यात दोन रुग्णांना आपला जीव गमवावा लागला आहे. राज्यातील कोरोना रुग्ण बरे होण्याचे प्रमाण सध्या ९८.१७ टक्क्यांवर पोहोचलं आहे तर मृत्यू दर हा १.८१ टक्के इतका आहे.



राज्यात शनिवारी कोरोनाच्या १४,७९० चाचण्या करण्यात आल्या. त्यामध्ये २,४२१ इतक्या आरटीपीसीआर चाचण्या होत्या तर १२,३६९ इतक्या चाचण्या या ठढ चाचण्या आहेत. आजच्या दिवसाचा कोरोनाचा पॉझिटिव्हिटी रेट हा १.०४ टक्के इतका आहे. जेएन १ व्हेरियंटच्या रुग्णांची संख्या ही १३९ इतकी झाली आहे. त्यामध्ये सर्वाधिक रुग्ण हे पुण्यातील आहेत. पुण्यात एकूण ९१ रुग्ण असून त्या खालोखाल नागपूरमध्ये ३० रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. ठाण्यामध्ये ५ तर बीडमध्ये ३, छत्रपती संभाजीनगरमध्ये २ आणि नांदेडमध्ये २ रुग्णांची नोंद करण्यात आली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



इच्छुकांची यादी आहे ती, बाशिंग नंतर बांधु !

कल्याण

245-15-140

# अभिमानास्पद! आता भारत सूर्याचा अभ्यास करणार

## आदित्य एल-१ नियोजित ठिकाणी पोहचले, इस्रोची यशस्वी झेप

सुराज्य/मुंबई

इस्रोकडून लाँन्च करण्यात आलेले आदित्य एल १ हे यान त्याच्या नियोजित ठिकाणी पोहचले आहे. यामुळे भारताला आता सूर्याचा अभ्यास करता येईल. आदित्य एल-१ हे एल१ बिंदूवर पोहोचलं आहे.

सूर्याच्या एल-१ बिंदूला halo orbit म्हणतात. २ सप्टेंबर २०२३ मध्ये इस्रोने सूर्याचा अभ्यास करण्यासाठी आदित्य एल-१ हे अंतराळात पाठवले होते. आदित्य एल १ हे लँग्रेज पॉईंट पोहचले असून पंतप्रधान मोदी यांनी याबाबत ट्विट करत माहिती दिली आहे.



**कसा होणार सूर्याचा अभ्यास? :** आदित्य एल १ मध्ये सात पेलोड्स बसवण्यात आले आहेत. यामधील चार पेलोड्स हे थेट सूर्याचा अभ्यास करणार आहेत. तर उर्वरित तीन हे वातावरणाचा अभ्यास करतील. विशेष म्हणजे ग्रहणकाळात देखील सूर्याचा अभ्यास करण्यास कोणतीही अडचण निर्माण होणार नसल्याचं इस्रोच्या शास्त्रज्ञांकडून सांगण्यात येत आहे. सूर्य हा एक तारा आहे. त्यामुळं सूर्यावर सतत काही ना काही स्फोट होत असतात. पण या कोणत्याही स्फोटांचा परिणाम या यानावर होणार नाही. सूर्यामधील अनेक रहस्यांचा उलगडा करण्यास हे यान इस्रोला मदत करेल.

- **सूर्याचे पहिले चित्र फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये मिळणार :** आदित्य-एल १ वरून सूर्याचे पहिले चित्र फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये मिळणार आहे. तएडउ ची निर्मिती भारतीय खगोल भौतिकी संस्थेने केली आहे. इस्रोच्या सन मिशनमध्ये स्थापित तएडउ सूर्याचे एचडी फोटो घेईल. एल १ पर्यंतचा प्रवास पूर्ण केल्यानंतर आदित्यचे सर्व पेलोड्स चालू होतील. म्हणजे त्यात बसवलेली सर्व उपकरणे सक्रिय होतील. त्यानंतर आदित्य सूर्याचा अभ्यास सुरू करेल. या दरम्यान, आदित्यवरील सर्व उपकरणे सुरळीतपणे सुरू आहेत की नाही, याची चाचणीदेखील इस्रोकडून करण्यात येणार आहे. आदित्य एल १ मध्ये विशेष यंत्रणा तयार करण्यात आली आहे, जेणेकरुन कोणत्याही परिस्थितीत यान सूर्याच्या कक्षात टिकू शकेल. आदित्य एल-१ ची रचना खास प्रकारे करण्यात आली आहे, ते सूर्याच्या फार जवळ जाणार नाही, पण लॅरेंज पॉईंटवर राहील आणि सूर्यावर संशोधन करेल. आदित्य एल-१ ही एक प्रकारे स्पेस टेलिस्कोप आहे, जी स्पेसमध्ये खास पद्धतीने काम करेल.
- **आदित्य एल-१ ला लॅग्रेंज पॉईंटवर पाठवलं :** इटालियन-फ्रेंच गणितज्ञ जोसेफ लुई लॅग्रेंज यांच्या नावावरून लॅग्रेंज पॉईंट्सची नावे आहेत. सूर्य आणि पृथ्वीच्यामध्ये पाच लॅग्रेंज पॉईंट आहेत. यातील एल-१ वर हे यान पाठवण्यात आलं आहे. पृथ्वीपासून ङ१ चे अंतर सुमारे १.५ दशलक्ष म्हणजेच १५ लाख किलोमीटर आहे. म्हणजेच आदित्य-एल१ पृथ्वीपासून तब्बल १५ लाख किलोमीटर दूर पाठवण्यात आलंय.

CMYK